# सेतू अभ्यास २०२३ : मराठी – इयत्ता दहावी : उत्तर चाचणी

**इयत्ता : दहावी** **एकूण गुण : ३०**

**विद्यार्थ्याचे नाव :** ........................................................................ **हजेरी क्र. :** ..................

**शाळेचे नाव :** ........................................................................ **दिनांक :** ....................

(**सूचना :** आवश्यकतेनुसार उत्तर लेखनासाठी पुरवणी कागद/वही वापरावी.)

**प्र. १) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती कर. (लेखन २, ३)**

अण्णा हसत हसतच म्हणाले, विठ्ठला, बंगला, मोटार, बागबगीचा, रुबाबदार कपडे, लिखाण करण्यासाठी वेगळी खोली, खोलीत फुलदाणी, टेबल, आरामखुर्ची या सर्व साधनांचा मला मोह नाही. अरे, झोपड्यात दीनदलितांची दुःखं मला अनुभवायाला मिळतात. गोरगरिबांची पोटतिडकीची भाषा. त्यांचं जीवनमान, तिथली वास्तवता मी झोपडीत राहूनच लिहू शकेन. बंगल्यात एक अक्षरही सुचणार नाही. बंगल्यात ओढून ताणून काल्पनिक लिखाण होईल, झोपडीत उपाशी पोटं कशी जगतात, पावसाळ्यात झोपडं गळतं तेव्हा त्या पाण्याखाली टेचकी, भगुलं, परात कशी लावली जाते, थंडीच्या महिन्यात दीनदुबळ्यांना थंडीत कुडकुडत बसावं लागतं. इथं दुःखाला झेलत जगणारी माणसे–त्यांची पालं–त्यांच्या हाणामाऱ्या, विठ्ठल, काय सांगू–अरे, वास्तवानं ओतप्रोत भरलेल्या या दुबळ्या जगाचं सत्य साहित्य मला बंगल्यात बसून लिहिता येणार नाही. माझ्या कादंबऱ्यांचं मानधन मॉस्कोतच राहू दे. त्या संपत्तीनं मी बिघडून जाईन, गरिबीला विसरून जाईन, सत्य लिखाणाला पारखा होईन, म्हणून मला ते मानधन नको.

**१) कोणत्या ते सांग. अण्णांना मोह नसलेल्या गोष्टी.** **(२ गुण)**

१) ........................................ २) ........................................

३) ........................................ ४) ........................................

**२) अ) फक्त एका शब्दात उत्तर लिही.** **(१ गुण)**

पावसाळ्यात झोपडी गळत असताना पाण्याखाली ठेवली जाणारी भांडी.

१) ........................................ २) ........................................

**आ) चूक की बरोबर ते सांग.** **(१ गुण)**

झोपडपट्टीतील वास्तव परिस्थिती लेखकाला लेखनास मदत करते. ........................

३) (३ गुण)

"वास्तवानं ओतप्रोत भरलेल्या या दुबळ्या जगाचं सत्य साहित्य मला बंगल्यात बसून लिहिता येणार नाही." लेखकाच्या या विधानाशी तुम्ही सहमत आहात का? स्पष्ट करून लिहा.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

**प्र. २) खालील पद्याच्या आधारे सूचनेप्रमाणे कृती कर. (वाचन ४)**

बाळ, चाललास रणा
घरा बांधिते तोरण
पंचप्राणांच्या ज्योतींनी
तुज करिते औक्षण.

याच विक्रमी बाहूंनी
स्वंतत्रता राखायची,
खांद्यावरी या विसावे
शांति उद्याच्या जगाची.

म्हणूनिया माझ्या डोळा
नाही थेंबही दुःखाचा;
मीहि महाराष्ट्रकन्या
धर्म माणते वीराचा.

नाही एकहि हुंदका
मुखावाटे काढणार.
मीच लावुनि ठेविली
तुझ्या तलवारीला धार.

अशुभाची साउलीहि
नाही पडणार येथे;
अरे मीहि सांगते ना
जिजा-लक्ष्मींशी नाते.

तुझ्या शस्त्रांना, अस्त्रांना
शक्ति देईल भवानी,
शिवरायाचे स्वरूप
आठवावे रणांगणी.

धन्य करी माझी कूस
येई विजयी होऊन,
पुन्हा माझिया हाताने
दूधभात भरवीन!

**१) योग्य पर्याय निवडा व विधान पुन्हा लिही.** (१ गुण)

अ) कवितेतील आई आपल्या मुलाला औक्षण करत आहे, कारण -

.....................................................................................................

१) मुलाचा वाढदिवस आहे. २) तो रणांगणावर जाणार आहे.
३) त्याने रणांगणावर शौर्य गाजवले आहे. ४) त्याने क्रीडास्पर्धेत नैपुण्य प्राप्त केले आहे.

आ) वीरमातेच्या डोळ्यात एकही थेंब येणार नाही कारण - **(१ गुण)**

.............................................................................................

१) तिला माहीत आहे तिचा मुलगा विजयी होणार आहे.
२) ती एक महाराष्ट्रकन्या आहे.
३) तिला भीती वाटत नाही.
४) तिने अशी अनेक युद्ध जिंकली आहेत.

२) **याच विक्रमी बाहूंनी, स्वतंत्रता राखायची,** **(२ गुण)**
**खांद्यावरी या विसावे, शांति उद्याच्या जगाची.** या काव्यपंक्तीतून कवयित्रीला काय सूचित करावयाचे ते लिही.

.............................................................................................

.............................................................................................

.............................................................................................

३) **धन्य करी माझी कूस येई विजयी होऊन,** **(२ गुण)**
**पुन्हा माझिया हाताने दूधभात भरवीन!** या काव्यपंक्तीतील भावसौंदर्य लिही.

.............................................................................................

.............................................................................................

.............................................................................................

**प्र. ३) व्याकरण घटकांवर आधारित कृती. (लेखन ४, भाषाभ्यास १, ३, ४)**

**अ) खालील काव्यपंक्तीतील अलंकार ओळखा व उपमेय व उपमान लिही.** **(२ गुण)**

ऊठ पुरुषोत्तमा । वाट पाही रमा । दावि मुखचंद्रमा । सकळिकांसी ।।

उपमेय : ................................ उपमेय : ................................

**ब) खालील वाक्प्रचारांचे अर्थ सांगून वाक्यात उपयोग कर.** **(२ गुण)**

१) सार्थक होणे : ...........................................................................

.............................................................................................

२) धूम ठोकणे : ...........................................................................

.............................................................................................

**क) खालीलपैकी शुद्ध शब्द ओळख.** **(१ गुण)**

१) उत्तीर्ण, उत्तिर्ण, उततीर्ण, उत्तिरण ..................................

**ड) खालील विरामचिन्हे ओळखून त्यांची नावे लिही.** **(१ गुण)**

१) ; : ............................ २) ! : ............................

**इ)** 'तुझ्या शस्त्रांना, अस्त्रांना, शक्ति देईल भवानी, **(१ गुण)**
शिवरायाचे स्वरूप, आठवावे रणांगणी' या काव्यपंक्तीतील रस ओळखा.

..........................................................................................

**प्र. ४) खालील विषयावर बातमी तयार कर. (लेखन ३, ८)** **(५ गुण)**

जिल्हा परिषद शाळा, उंबरगाव या शाळेत नाट्य शिबिर संपन्न झाले.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

**प्र. ५) जाहिरातलेखन. (लेखन ८)** **(५ गुण)**

पावसाळ्यात आवश्यक असणाऱ्या साहित्याची जाहिरात तयार कर.